# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

**स्थाई आदेश क्रमांक :- १९**

**विषय :- राज्यात अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची किंमत तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत ठरविणे बाबत.**

क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.१०२(०७-०८)/ /२००९-१०
नागपूर ४४० ००१, दिनांक

राज्यात अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची किंमत ठरवितांना तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत ठरवितांना सर्वच ठिकाणी एकसारखी पध्दत अस्तित्वात नाही. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी पध्दत अवलंबविण्यात येत आहे. त्यामुळे कांही ठिकाणी थुटांची किंमत ही वस्तुस्थितीपेक्षा कमी किंवा जास्त असते. जीवनशास्त्र विषयक पदार्थामध्ये होणा-या विस्तृत प्रमाणातील बदल हे जरी कमी जास्त होत असले तरी अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांची किंमत ही थुटावरुन ठरवितांना तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत ठरवितांना त्यामध्ये जास्त फरक राहु नये ही बाब लक्षातघेणे गरजेचे आहे. यामध्ये मुख्यत: अवैधरित्या तोडण्यात आलेल्या झाडांच्या थुटांची गोलाई ही किती उंचीवर घेण्यात यावी, तोडलेल्या थुटांच्या वृक्षाचे घनफळ किती असावे व ते कसे काढण्यात यावे, अवैधतोड झालेल्या वृक्षांची किंमत काढतांना कुठला दर लक्षात घेण्यात यावा तसेच जप्त करण्यात आलेल्या मालाच्या किंमतीची गणना करण्यासाठी कुठला दर लक्षात घेण्यात यावा या बाबत सर्व वनवृत्तस्तरावर एकरुपता राहणे आवश्यक आहे. याबाबत महालेखापाल यांचे दिनांक ८ सप्टेंबर २००७ चे बैठकीत महालेखाकार ऑडीट-II, नागपूर व अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सुध्दा पुनर्विलोकन करण्यांचे निर्देश दिलेले होते. त्यानुसार खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

(i) थुटाची गोलाई ही जमिनीपासुन १५ से.मी. उंचीवर घेण्यात यावी.

(ii) जमिनीपासुन १५ से.मि. वर घेतलेल्या थुटाच्या सालीसहीत गोलाईनुरुप Corresponding छातीगोलाई किती घ्यावी, याबाबतचे परस्परसंबंध (correlation) तसेच थुटाच्या उंचीवर सालीसहीत गोलाई लक्षात घेता संबंधीत गोलाईचे वृक्षापासुन किती घनमिटर माल निघु शकेल याचा तक्ता

खालील प्रमाणे दिला आहे. (सदर घनमिटर काढतांना भारतीय वनसंशोधन संस्था, डेहराडून यांनी प्रकाशित केलेल्या आकडेवारीचा आधार घेऊन व त्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार योग्य दुरुस्ती करण्यात आलेली आहे)

| अ.क्र. | थुटाच्या उंचीवर गोलाई वर्ग (साली सहीत) | त्या संबंधात छाती उंचीवरील गोलाई वर्ग (साली सहीत) | संबंधीत वनोपजाचे घनफळ प्रती झाड (घनमीटर मध्ये) | |
|---|---|---|---|---|
| | | | अमरावती/नागपूर/नाशिक/ उत्तर चंद्रपूर/दक्षिण चंद्रपूर व ठाणे वनवृत्तासाठी | औरंगाबाद/धुळे/ कोल्हापूर/ पुणे व यवतमाळ वनवृत्ताकरिता |
| १. | १५ - ३० | १५-३० | ०.००७ | ०.००७ |
| २. | ३० - ४५ | १५-३० | ०.०१६ | ०.०१६ |
| ३. | ४५-६० | ३०-४५ | ०.०३७ | ०.०३७ |
| ४. | ६०-७५ | ४५-६० | ०.०६१ | ०.०५९ |
| ५. | ७५-९० | ६०-७५ | ०.०९४ | ०.०८१ |
| ६. | ९०-१०५ | ७५-९० | ०.१४५ | ०.११० |
| ७. | १०५-१२० | ७५-९० | ०.२११ | ०.१४५ |
| ८. | १२०-१३५ | ९०-१०५ | ०.२९४ | ०.१९२ |
| ९. | १३५-१५० | १०५-१२० | ०.३८५ | ०.२४५ |
| १०. | १५०-१८० | १२०-१३५ | ०.५४२ | ०.३४२ |
| ११. | १८०-२१० | १३५-१५० | ०.७६३ | ०.४९३ |
| १२. | २१० च्यावर | १५०-१८० | १.०११ | ०.६७४ |

(iii) अवैधरित्या तोड झालेल्या वृक्षांचे वर्गीकरण खालील प्रमाणे ३ संवर्गामध्ये करण्यात यावे.

(अ) सागवान

(ब) उच्चप्रतीचे आडजात (Superior Ingali) (ऐन, बिजा, शिसम, शिवण, हल्दू, कलम इत्यादी)

(क) निम्नप्रतीचे आडजात (Interior Ingali) (तेंदू, मोहा, बेहडा, सालई, सेमल इत्यादी)

(iv) उपरोक्त (iii) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक संवर्गातील किती माल वनवृत्तातील सर्व आगारात दिनांक १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत विकल्या गेला आहे व त्यास किती किंमत प्राप्त झालेली आहे ही काढण्यात यावी. नंतर संवर्गातील एकुण प्राप्त किंमतीस त्या संवर्गातील एकूण विक्री झालेल्या

मालाने भागावे व जो सरासरी प्रति घनमिटर दर येईल तो प्रतिघनमिटर स्थुल दर (Gross) म्हणुन लक्षात घेण्यात यावा.

(v) दिनांक १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या एकवर्षाच्या कालावधीच्या दरम्यान किती मालाचे निष्कासन केले व त्याला किती निष्कासनाचा व वाहतूकीचा खर्च आला हे काढण्यात यावे. तदनंतर या खर्चास निष्कासीत झालेल्या मालाने भागुण प्रति घनमिटर सरासरी निष्कासनाचा व वाहतूकीचा दर म्हणुन लक्षात घेण्यात यावा.

(vi) उपरोक्त (iv) मधील प्रतिघनमिटर सरासरी दरातून उपरोक्त (v) मधील प्रतिघनमिटर सरासरी निष्कासनाचा व वाहतूकीचा दर वजा करुन निव्वळ प्रति घनमिटर सरासरी अनुसूचीत दर काढण्यात यावा.

(vii) सदर निव्वळ अनुसूचित दराने ज्या गोलाई वर्गातील वृक्षाची अवैध कटाई झ ााली त्यातील उपरोक्त (ii) मध्ये नमूद केलेल्या घनमिटरला गुणून वृक्षाची किंमत काढण्यात यावी.

(viii) जप्त केलेल्या मालासाठी सुध्दा उपरोक्त (vi) मध्ये नमूद केलेला अनुसूचित दर लावण्यात यावा. यासाठी जप्त केलेल्या मालाचे प्रत्यक्षात घनमिटर किती आहे हे काढुन व उपरोक्त (vi) मध्ये नमूद केलेल्या दराने गुणून जप्त मालाची किंमत काढण्यात यावी.

(ix) उपरोक्त (vi) मध्ये नमूद दर हा अवैध वृक्षतोडीच्या मौक्यावर जप्त माल तसेच इतर ठिकाणी जप्त माल या दोन्हीसाठी लागु करावा.

(x) उपराक्त (vii) नुसार येणा-या किंमतीतून (अवैधरित्या तोड केलेल्या वृक्षांच्या किंमतीमधुन) उपरोक्त (viii) नुसार येणारी किंमत (जप्त केलेल्या मालाची किंमत) वजा करुन उर्वरित जी रक्कम येईल ती रक्कम नुकसान म्हणुन समजण्यात यावी.

या पध्दतीनुसार जर मागील वर्षापेक्षा पुढील/चालु वर्षाचे अनुसुचित दर कमी असतील तर पुढील/चालु वर्षाकरिता अनुसुचित दर कमी करण्यात येवू नये व अशा परिस्थितीत मागील वर्षाचे अनुसुचित दर त्या पुढील/चालु वर्षाकरिता कायम ठेवण्यात

यावेत. मात्र पुढील/चालु वर्षाचे अनुसुचित दर मागील वर्षापेक्षा जास्त असतील तर अशा परिस्थीतीत पुढील/चालु वर्षाचे अनुसुचित दर लागु करण्यात यावे.

उपरोक्त निर्देशाचे पालन तंतोतंत करण्यात यावे. यामध्ये कुठलीही हयगय होणार नाही, याची वैयक्तिक दक्षता मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)/वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी ही दिनांक १ ऑक्टोंबर २००९ पासुन करण्यात यावी.

स्वा/-
प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा. नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक वनविकास महामंडळ, म.रा. नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
मुख्य वनसंरक्षक, (सर्व)
मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक (सर्व)
वनसंरक्षक, (सर्व)
उपवनसंरक्षक, प्रादेशिक (सर्व)
उप विभागीय वन अधिकारी प्रादेशिक (सर्व)

प्रतिलिपी :- अपर मुख्य सचिव (वने) महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडे माहितीकरीता सादर.

प्रतिलिपी :- महालेखाकार (ऑडिट-II) म.रा. नागपूर यांना दि.८ सप्टेंबर, २००७ ला घेतलेल्या बैठकीचे अनुरोधाने माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- कक्ष अधिकारी -१० प्रधान मुख्य वनसंरक्षक, कार्यालय, म.रा. नागपूर यांना ३ प्रतिसह माहितीकरीता रवाना.

**प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्यद्व नागपूर यांचे कार्यालय**

क्रमांक :- कक्ष-१८/दक्षता/नाशिक/अति/८९९/०३-०४
नागपूर, दिनांक : २४ डिसेंबर, २००३

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (सर्व) प्रा/ वन्यजीव
वनसंरक्षक (सर्व) प्रा/ वन्यजीव

विषय :-एखाद्या व्यक्तीस अटक वा स्थानबध्द करतांना करावयाच्या कार्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

संदर्भः- शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. एस-१४/२००३/प्र.१७९/फ-५, दिनांक २५/११/२००३

---

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन शासन पत्राची प्रत, सहपत्रासह, माहिती व आवश्यक कार्यवाहीस यासोबत पाठविण्यात येत आहे.

सहपत्र :- वरील प्रमाणे

स्वा/-
मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)
महाराष्ट्र राज्य, नागपूर करिता

**<u>शीघ्र टपालाने</u>**

क्रमांकः-एस-१४/२००३/प्र.क्र.१७९/फ-५
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २५/११/२००३

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक] महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर

विषय :-एखाद्या व्यक्तीस अटक वा स्थानबध्द करतांना करावयाच्या कार्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, श्री. डी.के. बसे विरूध्द पश्चिम बंगाल राज्य या प्रकरणांत मा. सर्वोच्च न्यायालयाने अटक वा स्थानबध्द करण्यात आलेल्या व्यक्तीस कायद्यानुसार काय काय अधिकार आहेत, याबाबत सविस्तर दिशानिर्देशित दिले आहेत. वन विभागाचे अधिकारी वनगुन्ह्यांत सहभागी असलेल्या व्यक्तीस अटक वा स्थानबध्द करण्यास भारतीय वन अधिनियमांच्या कलमाखाली सक्षम असून त्यांनी सूध्दा अशा प्रकारे कार्यवाही करतांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाचे पालन करणे आवश्यक आहे, परंतु असे निदर्शनांस आले आहे की, वन अधिकाऱ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची माहिती नाही.

२. उपरोक्त परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्देशांची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. या निर्देशांची प्रत तातडीने सर्व क्षित्रिय अधिकाऱ्यांना वितरीत करून सदर निर्देशांचे पालन करण्याच्या सूचना द्याव्यात व त्याप्रमाणे शासनास कळवावे.

सोबत :- वरील प्रमाणे

स्वा/-
(स. तु. घाडगे)
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग

**11. <u>REQUIREMENTS LAID DOWN BY SUPREME COURT TO BE FOLLOWED IN CASES OF ARREST OR DETENTION.</u>**

(1) The Police personnel carrying out the arrest and handling the interrogation of the arrestee should bear accurate, visible and clear identification and name tags with their designations. The Particulars of all such police personnel who handle interrogation of the arrestee must be recorded in a register.

(2) That the police officer carrying out the arrest of the arrestee shall prepare a memo of arrest at the time of arrest and such memo shall be attested by at least one witness, who may be either a member of the family of the arrestee or a respectable person of the locality from where the arrest is made. It shall also be counter signed by the arrestee and shall contain the time and date of arrest.

(3) A person who has been arrested or detained and is being held in custody in police station or interrogation centre or other lock-up, shall be entitled to have one friend or relative or other person known to him or having interest in his welfare being informed, as soon as practicable, that he has been arrested and is being detained at the particular place, unless the attesting witness of the memo of arrest is himself such a friend or a relative of the arrestee.

(4) The time, place of arrest and venue of custody of an arrestee must be notified by the Police where the next friend or relative of the arrestee lives outside the district or town through the Legal Aid Organisation in the District and the police station of the area concerned telegraphically within a period of 8 to 12 hours after the arrest.

(5) The person arrested must be made aware of this right to have someone informed of his arrest or detention as soon as he is put under arrest or is detained.

(6) An entry must be made in the diary at the place of detention regarding the arrest of the person which shall also disclose the name of the next friend of the person who has been informed of the arrest and the names and particulars of the police officials in whose custody the arrestee is.

(7) The arrestee should, where he so requests, be also examined at the time of his arrest and major and minor injuries, if any present on his/ her body, must be recorded at that time. The "Inspection Memo" must be signed both by the arrestee and the police officer effecting the arrest and its copy provided to the arrestee.

(8) The arrestee should be subjected to medical examination by a trained doctor every 48 hours during his detention in

custody by a doctor on the panel of approved doctors appointed by Director, Health Services of the concerned State of Union Territory, Director Health Services should prepare such a panels for all Tehsils and Districts as well.

(9) Copies of all the documents including the memo for arrest, referred to above, should be sent to the Zilla Magistrate for his record.

(10) The arrestee may be permitted to meet his lawyer during interrogation though not throughout the interrogation.

(11) A police control room should be provided at all district and state headquarters where information regarding the arrest and the place of custody of the arrestee shall be communicated by the officer causing the arrest, within 12 hours of effecting the arrest and at the police control room it should be displayed on a conspicuous notice board.

---

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण
प्राधिकृत प्रकाशन
सोमवार, सप्टेंबर २५, २००६/अश्विन ६, शके १९२८
स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग चार-अ
महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यामध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १९ सप्टेंबर, २००६

अधिसूचना

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३

क्रमांक टीआरएस-१०९५/प्र.क्र.११२/फ-६ -- ज्या अर्थी, राज्याच्या वन व संरक्षित क्षेत्रामधील वाढता धोका लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने राज्यातील वन कर्मचाऱ्यांना दारूगोळा हत्यारे देण्याचे ठरविले आहे;

आणि ज्या अर्थी, दारूगोळा हत्यारांच्या वापरामूळे वन कर्मचाऱ्यांना तापदायक फौजदारी कार्यवाहीला सामोरे जावे लागेल याची महाराष्ट्र शासनास जाणीव आहे;

त्या अर्थी, आता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) याचा कलम १९७, पोट-कलम (३) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वार करून, महाराष्ट्र शासन, याव्दारे, असे निर्देश देत आहे की--

(क) वन संरक्षणाशी संबंधित सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक आणि विभागीय वन अधिकारी यांना उक्त संहितेच्या कलम १९७ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदी लागू असतील;

(ख) वरील खंड (क) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही वनकर्मचाऱ्यांकडून गोळीबाराचा अवलंब करण्यात आला असेल, त्याबाबतीत अशा प्रत्येक घटनेची चौकशी त्या भागाच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडून करण्यात येईल, आणि दंडाधिकाऱ्याने केलेल्या चौकशीच्या परिणामी, दारूगोळा, हत्यारांचा अनावश्यक, बेजबाबदार व बेसुमार वापर करण्यात आला आहे, असा निर्णय

दिला गेला तर, आणि त्याची तपासणी केल्यानंतर, राज्य शासनाने असा अहवाल स्वीकारला असेल अशा बाबतीत फक्त, पोलीसांना, फौजदारी खटला दाखल करणे किंवा अटक करणे अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही सुरू करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नीला सत्यनारायण,**
शासनाचे प्रधान सचिव

# REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Manatralaya, Mumbai 400 032, dated the 19th September, 2006.

## ***NOTIFICATION***

Code of Criminal Procedure, 1973

No. TRS-1095/C.R.112/F-6 – Whereas, the Government of Maharashtra, being aware of the threats to which the forests and protected areas of the State are prone to, have decided to provide the forest personnel of the State with fire arms;

And whereas, the Government of Maharashtra is conscious that the use of fire arms may expose the forest personnel to vexatious criminal proceedings;

Now, therefore in exercise of the powers conferred by sub-section (3) of section 197 of the Code of Criminal Procedure, 1973(2 of 1974), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby directs, that,--

(a) the provisions of sub-section (2) of section 197 of the said Code, shall apply to the Forest Guards, Foresters, Range Forest Officers, Assistant Conservators of Forests, Deputy Conservators of Forests and Divisional Forest Officers, in the State of Maharashtra who are charged with the maintenance of public order relating to forest protection;

(b) Wherever firing is resorted to by any forest personnel mentioned in clause (a) above, each such incident shall be enquired into by the Executive Magistrate of; the locality; and any proceeding including instituting a criminal case or effecting an arrest can be initiated by the Police, only if it is held, as a result of the Magisterial Enquyiry that the use of the fire arms has been unnecessary, unwarranted and excessive

and such report has been accepted by the Government, after its examination.

By order and in the name of Governor of Maharashtra

NEELA SATYANARAYAN,
Principal Secretary to Government.

**<u>तात्काळ</u>**

क्रमांक:-टिआरएस-१०९५/प्र.क्र.११२/फ-६
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४ सप्टेंबर २०००

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय :-वनसंरक्षण या योजनेतंर्गत क्षेत्रीय वन अधिकारी / कर्मचारी यांना शस्त्र पुरवठा करणे बाबत

वनसंरक्षण या योजनेंतर्गत क्षेत्रीय वन अधिकारी / कर्मचारी यांना शस्त्र पुरवठा करण्याबाबतच्या टिप्पणीवर दिनांक २४/०८/२००० रोजी मंत्रिमंडळाने चर्चा केली व पुढील प्रमाणे निर्णय घेतले. या निर्णयाची प्रत यासोबत परिशिष्ट "अ" म्हणून जोडली आहे. सदरच्या शस्त्र पुरवठा योजनेची अंमलबजावणी सन २०००-२००१ पासून करावयाची आहे. एकूण आठ वर्षाच्या तीन टप्प्यांपैकी टप्पा क्रमांक-१ मध्ये ठाणे (वन्यजीव शाखेसह), धुळे, नागपूर, उत्तर चंद्रपूर, दक्षिण चंद्रपूर या वनवृत्तातील नोंद वन विभागातील फिरती पथके, विभागीय वन अधिकारी (दक्षता), सहाय्यक वनसंरक्षक व उपवनसंरक्षक यांना टप्पा क्रमांक २ मध्ये उपरोक्त ५ वनवृत्तात व वनविभागातील ५२ संरक्षण दलातील प्रत्येक पथकातील एक वनक्षेत्रपाल, ४ वनकर्मचारी व सर्व प्रादेशिक वनक्षेत्रपाल, सहाय्यक वनसंरक्षक व उपवनसंरक्षक व टप्पा क्रमांक ३ मध्ये ३३ संरक्षण दलातील प्रत्येक पथकातील एक वनक्षेत्रपाल व ४ वन कर्मचाऱ्यांना, उर्वरित ६ वनवृत्तातील सर्व प्रादेशिक वनक्षेत्रपाल, सहाय्यक वनसंरक्षक व उपवनसंरक्षक (वन्यजीव शाखेसह) यांना अशा प्रकारे सर्व वनवृत्तातील एकूण ७२० वन अधिकारी यांना ९ एमएम पिस्तूल व वनकर्मचाऱ्यांना ५१४ एसएलआर रायफल पूरवावयाच्या आहेत. सन २०००-२००१ या प्रथम वर्षामध्ये रूपये २७.५३ लक्ष इतकी तरतूद करण्यासाठी विभागाने कार्यवाही करण्यासाठी व या प्रथम वर्षात ९ एमएमचे ३२ पिस्तूल व ८७ एसएलआर रायफल्स खरेदीसाठी मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे. मंत्रीमंडळाच्या सदरच्या निर्णयास (परिशिष्ट-अ) अनुलक्षून आपणास मुद्येनिहाय खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

मुद्या (अ) - यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे

मुद्या (ब) - यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे

मुद्या (क) - ला अनुलक्षुन आपण टाटा कन्सलटंसी सर्व्हिसेस यांनी वन विभागातील कोणते विभाग, बिटस् हे अतिसंवेदनशिल/ संवेदनशिल म्हणून शिफारस केलेले आहेत, तसेच प्रथम वर्षात देण्यात यावयाची शस्त्रे व पिस्तुल व एसएलआर (रायफल्स) हे त्यांच्या संवेदनशिलतेप्रमाणे कोठे देण्यांत यावीत याची निवड करून, त्या प्रमाणे प्रथम वर्षाचा रूपये २७.५३ लक्ष रकमेचा पुरवणी मागणी प्रस्ताव शासनास सादर करावा. यामध्ये प्रथम वर्षाच्या शस्त्र सामुग्रीच्या खरेदीसह कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण इ. खर्चाचा समावेश राहील.

मुद्या (ड) - परिशिष्ट-१ मधील वनकर्मचाऱ्यांना शस्त्र वापरण्याबाबत आचार संहिता व नियमावलीस मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. आचारसंहिता व नियमावलीची प्रत यासोबत जोडली आहे.

मुद्या (इ) - मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुरूप प्रथम वर्षी किती अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, त्यासाठी किती खर्च येणार आहे याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास पाठवावा. आपला प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात गृह विभागास त्यांची मान्यता देण्याबाबत कळविण्यांत येईल.

मुद्या (ई) - संदर्भात शासनस्तरावर (स्वतंत्रपणे) वेगळयाने कार्यवाही करण्यांत येईल.

मुद्या (फ) - या संदर्भात शासनस्तरावर स्वतंत्रपणे गृह मंत्रालय, भारत सरकार यांना कळविण्यात येत आहे

मुद्या (ह) - सदरहु रकमेचा वर्षवार सविस्तर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठवावा. यात मुद्या क्रमांक क मधील बाब त्या त्या वर्षासाठी प्रशिक्षण खर्चासह विचारात घेण्यात यावी.

विषयांकित प्रकरणाच्या मंत्रिमंडळाच्या मान्यतेच्या अनुषंगाने शासनास तातडीने कार्यवाही करावयाची असल्यामुळे आपणास कळविल्या प्रमाणे मुद्येनिहाय माहितीवरील आपला सविस्तर प्रस्ताव शासनास तात्काळ पाठवावा, ही विनंती.

स्वा/-
(अ. ना. त्रिपाठी)
उप सचिव
महसूल व वन विभाग

सोबत :- (१) मंत्रीमंडळ निर्णयाची परिशिष्ट "अ" प्रत
(२) शस्त्र वापराबाबत आचार संहिता व नियमावलीची प्रत

## परिशिष्ट-१

वन कर्मचा-यांना शस्त्र वापरण्याबाबत- आचारसंहिता व नियमावली

१. विविध वन गुन्हे प्रकरणी सराइत आणि संघटीत अशा वन गुन्हेगारांशी सामना करतेवेळी शासकीय मालमत्तेचे संरक्षण आणि वन कर्मचा-यांना स्वतःच्या जीव संरक्षणार्थ राज्यातील वन कर्मचा-यांना खालीलप्रमाणे शस्त्र पुरवठा करण्यांत येत आहे.

(१) वनक्षेत्रपाल आणि वरच्या पदाचे अधिकारी :- ९ एम.एम. पिस्तोल

(२) वनपाल वनरक्षक :- एस.एल.आर.रायफल

शस्त्र वापरण्यासाठी वन कर्मचारी/अधिकारी यांना प्रशिक्षित करण्यांत येईल.

२. भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय वन अधिनियम, वन्यजीव संरक्षण अधिनियम इत्यादी नियमांमध्ये वन कर्मचा-यांनी शस्त्रास्त्रांचा उपयोग करण्याबाबत कोणत्याही विवक्षित तरतूदी नाहीत. मात्र इतर नागरिकांप्रमाणे वन कर्मचारी भारतीय दंड संहितेच्या कलम ९६ ते १०६ अन्वये स्वरक्षणार्थ स्वतःचा हक्क प्रस्तावित करु शकतात या आधारे वन अधिकारी/कर्मचारी खालील अटीस अधीन राहून शस्त्राचा वापर करतील :-

२.१ अत्यंत गरजेच्या वेळीच शस्त्रांचा उपयोग करावा. मात्र सूर्यास्तनंतर सूर्योदयापर्यंत शस्त्रांचा वापर कटाक्षाने टाळण्यांत यावा.

२.२ वन कर्मचारी शस्त्रांचा वापर केवळ शासकीय राखीव वन आणि संरक्षित वनक्षेत्रातच करतील.

२.३ वन कर्मचारी हत्यारासह वनक्षेत्रात कमीत कमी तीनच्या समुहाने फिरती करतील.

३. वन कर्मचारी खालील प्रसंगीच शस्त्रांचा उपयोग करु शकतील :-

३.१ वन संपत्तीचे आणि वन्यजींवाचे संरक्षण करण्यासाठी

३.२ स्वतःच्या जीवाचे संरक्षण करण्यासाठी इतर सर्व मार्ग संपुष्टात येतील, त्यावेळी

३.३ इतर प्रसंगी जसे,

३.१ मौल्यवान वन उपजांची वाहनांद्वारे अवैध वाहतूक होत आहे असे आढळून आल्यास व वनकर्मचा-यांनी वारंवार निर्देश देऊनही वाहन चालकाने वाहन न थांबविल्यास

३.३.२ जेव्हा गुन्हेगार प्रवृत्तीचे व्यक्ती शस्त्रासहीत अवैध वृक्षतोड आणि अवैध शिकारीच्या उद्वेशाने राखीव/संरक्षीत वनक्षेत्रात आढळून येतील व त्यांना वारंवार निर्देश देऊनही त्यांनी शस्त्र समर्पण व केल्यास

३, ३.३ वन कर्मचा-यांवर गुन्हेगारांच्या टोळीकडून अचानक मोठया प्रमाणावर हल्ला झाल्यास,

३, ३.४ वनसंरक्षणाचे कार्य बजावित असतांना संघटित गुन्हेगारांच्या टोळयांद्वारे वन वनकर्मचा-यांचे अपहरण होण्याची शक्यता निदर्शनास आल्यास,

उपरोक्त बाबी हया केवळ उदाहरण दाखल आहेत. मात्र वन कर्मचा-यांनी सदसद विवेक बुध्दीने सारासार विचार करुनच शस्त्रे वापरण्याबाबत निर्णय घ्यावा. तथापि,अशा प्रकार शेवटचा पर्याय म्हणुन शस्त्रांचा वापर केल्यास त्याला ठोस कारणमिमांसा द्यावी लागेल.

४. गंभीर स्वरुपाचे वनगुन्हे होऊ नयेत यासाठी शस्त्रांचा वापर करण्याचा मूळ उद्वेश असल्याने,हा उद्वेश सफल होत आहे असे आढळून आल्यास शस्त्रांचा वापर त्वरीत थांबविण्यांत यावा. वन गुन्हेगारांना ठार मारण्याचा उद्वेश कधीही ठेवण्यांत येवू नये.

५. वन कर्मचा-यांनी संघटीतरित्याच वनसंरक्षणचे काय करावे. अशा वेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या वरिष्ठ अधिकारी/कर्मचा-यांचे शस्त्रांच्या वापराचा निर्णय घ्यावा.

६. शस्त्रांचा वापर करण्यापूर्वी वन कर्मचा-यांनी हात संचाच्या लाऊडस्पीकरणे गुन्हेगारांना वनगुन्हा न करण्याबद्वल वारंवार आवाहन करावे व अन्यथा शस्त्रांचा वापर करण्यात येईल अशी स्पष्ट चेतावणी दयावी.

७. कोणीही वनकर्मचारी मद्यपान केल्यानंतर हत्याराचा वापर करणार नाही व हत्यार सोबत बाळगणार नाही.

८. वन कर्मचारी महाराष्ट्र शस्त्र अधिनियम,१९५९ मधील तरतुदीच्या अभ्यास करतील व नंतरच हत्याराच वापर करतील. याबाबतची माहीती संबंधित कर्मचा-यांनी प्रशिक्षणाच्या वेळी प्राप्त करुन घ्यावी.

९. वन कर्मचा-यांनी शस्त्राचा वापर केल्यानंतर करावयाची कार्यवाही :-

९.१ शस्त्रांचा वापर केल्यानंतर खालील पैकी एका स्थितीची शक्यता असू शकेल :-

(अ) कोणीही आरोपी जखमी न होणे,

(ब) एक किंवा एका पेक्षा अधिक गुन्हेगार जखमी होणे,

(क) एक किंवा एका पेक्षा अधिक गुन्हेगार मृत होणे,

उपरोक्त कोणत्याही स्थितींनतर सदर घटनेची माहीती दूरध्वनीद्वारे/तारेद्वारे/फॅक्सद्वारे/खास दुताद्वारे शिघ्रतशिघ्र खालील अधिका-यांना कळविण्यांत यावी.:-

१) संबंधित पोलीस स्टेशन,

२) उप वनसंरक्षक (प्रादेशिक)

३) वनसंरक्षक (प्रादेशिक)

४) मुख्य वनसंरक्षक (संधारण) आणि क्षेत्राचे सबंधित मुख्य वनसंरक्षक

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक,

६) जिल्हाधिकारी,

७) जिल्हा पोलीस अधिक्षक,

८) क्षेत्राचे संबंधित न्याय दंडाधिकारी,

९.२) सदर घटनेची माहिती प्राप्त होताच संबंधित पोलीस स्टेशन मार्फत पुढील कायवाही होईल.

९.३) मृत व्यक्ती जर असेल तर, त्या व्यक्तीच्या शवाचा ताबा घेऊन पुढील कार्यवाही करतील आणि शांतता व सुव्यवस्था राखतील,

९.४) जखमी व्यक्तींना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी नजीकाच्या वैद्यकीय केंद्रात हलविण्यांत येईल.

९.५) ज्या वन कर्मचारी/अधिका-यांने शस्त्राचा वापर करण्याचा आदेश दिला. त्यांने सविस्तर अहवाल पोलीस स्टेशन तसेच क्षेत्रांच्या न्याय दंडाधिकारी यांना शस्त्रांचा वापर का करण्यांत आला याची सबळ कारणे स्पष्टपणे सदर अहवालात नमुद करावीत.

९.६) शस्त्रांचा वापर झाल्यानंतर लगेच स्थितीत कोणतेही बदल न करता स्थितीचे छायांचित्र आवश्यक घेण्यांत यावे. कोणी व्यक्तह मृत झाल्यास त्यांचेही छायांचित्र काढण्यांत यावे.

१०. घटनेबाबत दंडाधिकारी यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल जिल्हाधिकारी मार्फत शासनास सादर करण्यांत येईल. शासनाकडून याबाबत सूचना प्राप्त झाल्यानंतरच पोलीस याबाबत कार्यवाही करतील.

१०.२ या घटनेची दंडाधिकारी मार्फत चौकशी पूर्ण होई पर्यन्त कोणीही कर्मचा-यांना घटनास्थळ सोडू नये.

११. संबंधित उप वनसंरक्षक हे घटनेची सविस्तर माहीती वनसंरक्षक,मुख्य वनसंरक्षक (संधारण) आणि प्रधान मुख्य वनसंरक्षकांना घटना घडल्यानंतर २ दिवसांचे आत सादर करतील.

१२. सदर घटनेचा गुन्हा वन कर्मचारी नोंदविणार नाहीत. हे कार्यपोलीस विभागाच्या कक्षेत येत असल्याने याबाबत पुढील कार्यवाही पोलीस विभागाकडून होईल त्यांना त्याबाबत मदत करण्यांत यावी,

१३. शस्त्रांच्या सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी :-

१३.१) शस्त्रांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित वन कर्मचा-यांची राहील,

१३.२) सर्व शत्रांचा आणि गोळयांचा हिशेब संबंधित उप वनसंरक्षक आणि संबंधित वनक्षेत्रपालाने ठेवावा. परिक्षेत्र कार्यालयात शस्त्र आणि गोळयांचा साठी सुरक्षितपणे संबंधित वनक्षेत्रपालांच्या आखत्यारित राहील,

१३.३) प्रत्येक शस्त्र आणि गोळया कोणकोणत्या वन कर्मचा-यांना दिल्यास त्याचा हिशोब ठेवण्यांत यावा. एका वन कर्मचा-याला नेमून दिलेले शस्त्र दुस-या वनकर्मचायाने वापरु नये केवळ अपवादात्मक परिस्थितीत असे करणे योग्य राहील.

१३.४) वनपरिक्षेत्र,कार्यालयात वनपाल दर्जाचा प्रशिक्षित आर्मर राहील.

१४. शस्त्र हाताळण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या वन कर्मचा-यांनाच शस्त्र पुरवठा करण्यांत यावा.

१५. शस्त्र गुन्हेगार, अतिरेकी किंवा नक्षलवादी यांच्या ताब्यात जाणार नाहीत याची पूर्ण दक्षता संबंधित वन कर्मचा-यांची/अधिका-यांची राहील.

१६. वन कर्मचारी संपावर जाण्यापूर्वी आपले कडील सर्व हत्यारे वन परिक्षेत्र कार्यालयात गोळयांचे साठयासह जमा करतील.

१७. महाराष्ट्र शस्त्र अधिनियमातील नियम ४२ (१) नुसार, कर्मचारी याला त्याची कर्तव्ये करतांना स्वसंरक्षणासाठी शासनाने दिलेले शस्त्रे हाताळयासाठी शस्त्र परवान्याची आवश्यकता नाही.

क्रमांकः-टिआरएस-१०९५/प्र.क्र.११२/फ-६
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०६/१२/२००५

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय :- वनकर्मचाऱ्यांना शस्त्र वापरण्याबाबत आचारसंहिता व नियमावली/ अंमलबजावणीबाबत
संदर्भ :- (१) शासनपत्र क्रमांक दिनांक ८/३/२००२
(२) आपले पत्र क्र. कक्ष-१८/दक्षद्धाता/प्र.क्र.२०२(०१-०२)/ भाग-१/६७२/०४-०५, दि. १६/१०/२००४

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भित पत्र क्रमांक १ व २ कृपया पहावेत.

२. उपरोक्त विषयाबाबतच्या आपल्या संदर्भाधीन पत्र क्रमांक १ च्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, वनकर्मचाऱ्यांना शस्त्र वापरण्याबाबतच्या आचारसंहिता व नियमावलीस मंत्रीमंडळ प्रस्तावातील ११(ड) खाली मंत्रीमंडळाने दिनांक २४/०८/२००० रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संदर्भीत शासनपत्र समक्रमांक दिनांक ८/३/२००२ सोबत आपणांस आचारसंहिता व नियमावली (मराठी व इंग्रजी) पाठविण्यात आली असून सदरहु आचारसंहिता व नियमावलीच्या प्रती सर्व संबंधितांना पाठवाव्यात अशी आपणांस विनंती करण्यात आली आहे.

३. आपल्या संदर्भाधीन दिनांक १६/१०/२००४ च्या पत्रान्वये नमूद केलेल्या प्रस्तावित उपाययोजना, शस्त्र वापरण्याबाबतच्या आचारसंहिता व नियमावलीतील मुद्या क्रमांक १५ मध्ये समावेश करण्यास शासनाची अनुमती प्रदान करण्यात यावी अशी आपण शासनास विनंती केली आहे. त्यास अनुलक्षून खालील प्रमाणे नमूद केलेल्या उपाययोजना आचारसंहिता व नियमावलीतील मुद्या क्रमांक १५मध्ये समाविष्ट करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

- एका वनकर्मचाऱ्याला नेमून दिलेले शस्त्र कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या कर्मचाऱ्याने वापरू नये.

- गुन्हेगार, अतिरेकी किंवा नक्षलवादी प्राबल्य वनक्षेत्रात एकट्या-दुकट्या वनकर्मचाऱ्याने शस्त्रासह जाऊ नये. अशा क्षेत्रात फिरती करतांना वनकर्मचाऱ्यांनी ८-१० कर्मचाऱ्यांच्या समुहासह फिरती करावी.
- शस्त्रधारी वनकर्मचाऱ्याने त्यांच्या जवळील पिस्तुल अथवा रायफल साखळीच्या सहाय्याने स्वत:च्या कंबरेला बांधुन फिरती करावी.
- शस्त्र हाताळण्याचे प्रशिक्षण न घेतलेल्या वनकर्मचाऱ्यांच्या ताब्यात शस्त्र कदापिही देऊ नयेत.
- वनकर्मचारी जेंव्हा जेंव्हा शस्त्रासह राखीव / संरक्षित वनक्षेत्रात फिरती करतील, त्यावेळी शक्यतोवर त्याबाबतची पूर्व कल्पना संबंधित उपवनसंरक्षक/ सहाय्यक वनसंरक्षक यांना देतील. अशा फिरस्तीच्या पूर्वी आणि नंतर शस्त्र/दारूगोळ्याचा हिशोब संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी/ सहाय्यक वनसंरक्षक हे स्वत: तपासून शस्त्र/ दारूगोळ्याच्या संख्येबाबत खात्री करतील.
- रायफलचा पुरवठा केवळ फिरत्या पथकातील कर्मचाऱ्यांनाच करावयाचा असल्याने अशा कर्मचाऱ्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक यांच्या नियंत्रणाखालीलच फिरती करावी.
- नक्षलग्रस्त राखीव/ संरक्षीत वनक्षेत्रात शस्त्रासह समुहाने फिरती करण्यापूर्वी संबंधित पोलीस स्टेशनला गोपनीयरित्या आगाऊ सूचना द्यावी.
- वनकर्मचाऱ्यांना पुरवठा करण्यात आलेल्या शस्त्राचे पंजीबध्द क्रमांक संबंधित पोलीस स्टेशनला माहितीकरिता कळविण्यात यावे.

वर नमूद उपाययोजनांचा आचारसंहिता व नियमावलीतील मुदद्यदा क्रमांक १५ मध्ये समाविष्ट करून, प्रती सर्व संबंधितांना पाठवाव्यात, ही विनंती.

स्वा/-
(आ. वि. आष्टेकर)
सहसचिव (वने)
महसूल व वन विभाग

**परिशिष्ट "अ"**

**विषय क्रमांक १५ :-** **वनसंरक्षण या योजनेअंतर्गत क्षेत्रित वन अधिकारी/ कर्मचारी/ यांना शस्त्रांचा पुरवठा करणे बाबत**

या विषयावरील विभागाने सादर केलेल्या टिप्पणीवर मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि खालील प्रमाणे निर्णय घेतले.

(अ) राज्यातील वन खात्यातील शासनाने निर्देशित केलेले वन अधिकारी आणि वन कर्मचारी यांना शासकीय कर्तव्य बजावण्याकरिता महाराष्ट्र शस्त्र अधिनियम नियम पुस्तिकेतील लिसम ४२ अनुसार वनसंरक्षणार्थ व स्वसंरक्षणार्थ पिस्तोल व रायफल यांचा वन विभागाने पुरवठा करण्यास मंजूरी देण्यात यावी.

(ब) अशा शस्त्रास्त्रांचा वापर हा भारतीय दंड संहितेच्या कलम ९६ ते १०६ मधील तरतूदीच्या अधिन राहुन करण्यास वन अधिकारी व वनकर्मचारी यांना मंजूरी देण्यात यावी.

(क) सदरहु शस्त्रास्त्रांची खरेदी केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय, नवि दिल्ली यांचेकडून करण्यास वन विभागाला मंजूरी देण्यात यावी

(ड) वन अधिकाऱ्यांनी/ कर्मचाऱ्यांनी शस्त्रास्त्रांचा वापर कसा करावा, शस्त्रांची देखभाल, शस्त्रांचा वापर केल्यानंतर परिस्थितीनुसार पुढील कायदेशिर बाबी कशा हाताळावयाच्या इत्यादी विषयी तयार करण्यात आलेली आचार संहिता व नियमावलीस मान्यता देण्यात आली.

(इ) वन अधिकारी/ कर्मचारी यांना शस्त्रे व दारूगोळयाचा वापर करण्याबाबतचे राज्य राखीव पोलीस दल गट क्र. १ पुणे येथे प्रशिक्षण देण्यात यावे.

(ई) वन विभागाची शस्त्रे व दारूगोळा ठेवण्याकरिता मुंबई पोलीस नियमावली भाग २ नियम ३१(१३) मध्ये "वन विभाग" हे शब्द समाविष्ठ करण्यास मंजूरी देण्यात यावी.

(फ) वन अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रसंगी केलेल्या गोळीबार प्रकरणी त्यांना संरक्षण देण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १३२ नुसार या संहितेच्या कलम १२९ मध्ये "वनविभगाचे तत्सम अधिकारी/ कर्मचारी" हे शब्द समाविठ करण्याकरिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.

(ह) या ८ वर्षीय योजनेस एकूण रू.३७२.७३ लक्ष इतका वित्तीय भार असून सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात रू. २७.५३ लक्ष इतकी तरतूद करण्यासाठी विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी.